**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय**
**पिंपरी, पुणे ४११ ०१८**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध दवाखाना / रुग्णालयांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात दरमहा एकत्रित मानधनावर भरणेबाबत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्गंत विविध रुग्णालये व दवाखान्याकरीता दरमहा एकत्रित मानधनावर खालीलप्रमाणे नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता भरावयाची आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्गंत कोरोना विषाणूचे पार्श्वभूमीवर विविध रुग्णालये व दवाखान्याकरीता दरमहा एकत्रित मानधनावर खालील तक्त्यात नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता भरावयाची आहेत. सदर पदांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, आरक्षण तपशील व अटी - शर्ती खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | बालरोग तज्ञ | १) MBBS व M.D. (Paediatrics) ही पदवी / D.C.H. ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी बंधनकारक. |
| २ | भुलतज्ञ | १) MBBS व M.D. (Anaesthesia) ही पदवी / D.A. ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक<br>२) उत्तीर्ण झालेनंतर १ वर्षे कामाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी बंधनकारक |
| ३ | फिजिशियन | १) MBBS व M.D. (Medicine) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) उत्तीर्ण झालेनंतर ६ महिने कामाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी बंधनकारक |
| ४ | वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस) | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील M.B.B.S. ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील नोंदणी बंधनकारक. |
| ५ | वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस / बीएएमएस) | १) मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील M.B.B.S. / B.A.M.S. पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल / सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडीयन मेडिसीन यांचेकडील नोंदणी बंधनकारक |
| ६ | निवासी वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस / बीएएमएस) | १) मान्यता प्राप्त विद्यापिठा कडील M.B.B.S. / B.A.M.S. पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल / सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडीयन मेडिसीन यांचेकडील नोंदणी बंधनकारक. |
| ७ | फार्मासिस्ट | १) शासनमान्य संस्थेकडील B.Pharm. ही पदवी / D.Pharm. ही पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिल यांचेकडील नोंदणी बंधनकारक<br>३) P.P.P. रजिस्ट्रेशन अद्यावत असणे आवश्यक |



Scanned with CamScanner

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| ८ | स्टाफनर्स | १) B.Sc. / M.sc. Nursing / B.P.N.A. / R.G.N.M.कोर्स पूर्ण असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या तज्ञ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व इतर तांत्रिक संवर्गातील पदांना शैक्षणिक अर्हता व त्यांचा अनुभव विचारात घेऊन खालील प्रमाणे मानधन अदा करण्यात येईल:

| शैक्षणिक अर्हता | मानधन |
|---|---|
| एम.बी.बी.एस | दरमहा र.रु. ५५,०००/- |
| एम.बी.बी.एस + पदव्युत्तर पदविका | दरमहा र.रु. ६०,०००/- |
| एम.बी.बी.एस + पदव्युत्तर पदवी | दरमहा र.रु. ६५,०००/- |
| बी.ए.एम.एस. | दरमहा र.रु. ३५,०००/- |
| निवासी वैद्यकीय अधिकारी MBBS<br>निवासी वैद्यकीय अधिकारी BAMS | दरमहा र.रु. ६०,०००/-<br>दरमहा र.रु. ४०,०००/- |
| फार्मासिस्ट व स्टाफनर्स | दरमहा र. रु. २२,३४९/- |

टिप-

१. वरीलप्रमाणे जाहिरातीच्या अनुषंगाने कोरोना विषाणूचे पार्श्वभूमीवर उमेदवारांनी महापालिकेमध्ये समक्ष येण्याची आवश्यकता नाही.

२. सद्यपरिस्थिती लक्षात घेता संपूर्ण राज्यामध्ये लॉकडाऊनची परिस्थिती असून प्रवासाची कोणतीही साधने उपलब्ध नाहीत. त्यामुळे वरीलप्रमाणे नमुद पदांकरीता स्थानिक उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

३. वरीलप्रमाणे नमूद पदे ई-मेलद्वारे प्रथम प्राप्त होणाऱ्या अर्जाचे उमेदवारास प्रथम प्राधान्य या तत्वावर भरण्यात येणार आहेत. त्यानुसार प्राप्त होणाऱ्या अर्जांची प्रतिक्षासूची तयार करुन आवश्यकतेनुसार उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येणार आहेत.

४. याकरीता उमेदवारांनी सोबत नमूद केलेली माहिती तयार करुन महापालिकेच्या recruitment.medho@pcmcindia.gov.in या ई-मेल वर आवश्यक ती कागदपत्रे स्कॅन करुन पी.डी.एफ. स्वरुपात पाठवावी. सदरचा अर्ज व कागदपत्रांची आवश्यक ती छाननी करुन पात्र उमेदवारांचे आदेश निर्गत करण्याची कार्यवाही वैद्यकिय विभागामार्फत केली जाईल.

५. आदेश निर्गत केलेनंतर उमेदवारांना संपर्क साधला जाईल. तदनंतर उमेदवारांनी तातडीने रुजू होणे बंधनकारक असेल. रुजू होतेवेळी उमेदवाराने कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती कार्यालयाकडे दाखल करणे बंधनकारक राहिल.

६. ई-मेलद्वारे सादर केलेल्या प्रती व प्रत्यक्ष रुजू होताना सादर करावयाच्या प्रतींमध्ये तफावत आढळल्यास उमेदवारास रुजू करुन घेतले जाणार नाही, याची स्पष्टपणे नोंद घ्यावी.



Scanned with CamScanner

७. नियुक्ती देण्यात आलेल्या तज्ञ वैद्यकिय अधिकारी, वैद्यकिय अधिकारी यांना आपत्कालीन परिस्थितीचे अनुषंगाने महापालिका निश्चित करेल अशा कोणत्याही रुग्णालयामध्ये रुग्णसेवा देणे बंधनकारक राहिल. याकरिता ते २४ तास महापालिका सेवेप्रती बांधील राहतील.

८. उमेदवारास कोणताही प्रवासखर्च देय असणार नाही अथवा त्यांना याबाबत कोणतेही सहाय्य करणेत येणार नाही.

९. प्रस्तुतच्या मानधनावर करावयाच्या नेमणुका ह्या पुर्णपणे तात्पुरत्या / हंगामी स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास मनपामधील कोणत्याही पदावर कायमस्वरुपी नेमणुकीचा हक्क सांगता येणार नाही. याबाबत विहित नमुन्यात हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

१०. ज्या दिवशी मनपास सदर पदांची आवश्यकता नसेल, त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.

११. उपरोक्त पदांकरीता उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना सोबत जोडणेत आलेला आहे.

१२. निवड केलेल्या उमेदवारांना महापालिकेने ठरवुन दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये आवश्यकतेनुसार ३ शिफ्टमध्ये कामकाज करावे लागेल.

१३. वय वर्षे ६० पूर्ण असणा-या उमेदवारांनी उपरोक्त नमूद पदांसाठी अर्ज करुन नयेत, असे अर्ज अपात्र समजण्यात येतील.

१४. सदर उमेदवारांना महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत असणाऱ्या दवाखाना / रुग्णालयामध्ये कामकाज करावे लागेल. तथापि, नेमून दिलेल्या दवाखाना / रुग्णालयामध्ये आवश्यकता नसलेस अन्य ठिकाणी नियुक्ती देण्यात येईल. त्याचबरोबर आवश्यकतेनुसार अन्य रुग्णालये / दवाखान्यांमध्ये कामकाज करावे लागेल.

१५. महापालिका विहित करेल त्या सर्व अटी व शर्ती उमेदवारावर बंधनकारक राहतील.

१६. सदरच्या नेमणूका कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवलेले आहेत.

(डॉ. पवन साळवे)
**अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
वैद्यकिय मुख्य कार्यालय
क्र. वैद्य/१/कावि/ ४७९ /२०२०
दि. १७-०४-२०२०

E:\ABB\Mandhan2020\Jan2020\CoronaRecruitment\Advt.docx

Scanned with CamScanner

# उमेदवाराने ई-मेलद्वारे सादर करावयाची माहिती

विषय - ................. या पदासाठी अर्ज

नाव -
पत्ता -

मोबाईल क्रमांक -
ई-मेल आय.डी. -

जन्मदिनांक -

शैक्षणिक अर्हता -

अनुभव (असल्यास) -

---

ई-मेलद्वारे सादर करावयाची कागदपत्रे -

१. शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे
२. नोंदणी प्रमाणपत्र
३. नुतनीकरण प्रमाणपत्र
४. जन्मतारखेचा पुरावा
५. ओळखपत्र (आधारकार्ड, वाहनपरवाना, पॅनकार्ड इ. पैकी एक)

अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी–चिंचवड महानगरपालिका
पिंपरी–४११ ०१८.

Scanned with CamScanner